भ. नि. नि. विभाग
जावक क्र. 847
दिनांक 21 AUG 2010


महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ

फोन नं . २४०९०३५१

Email: cgmp@mahadiscom.in
Website: WWW.mahadiscom.in

ले.वि./भनिनि/ आरएसएम/२०१०-११
भविष्य निर्वाह निधी विभाग,
धारावी रोड, माटुंगा (पू) मुंबई -४०० ०१९.
दिनांक :


# परिपत्रक

विषय: सन २०१०-११ ची भ.नि.नि.अनुसूची सादर करणेबाबत.

सन २००९ -१० ची अनुसूची या कार्यालयास प्राप्त झालेनंतर खालील सही करणा-यांच्या लक्षांत खालील तृटी आढळून आलेल्या आहेत.

तरी वरील विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, सन २०१०-११ ची भ.नि.नि.अनुसूची सादर करताना खालील सूचना विचारात घ्याव्यात.

१. भ.नि.नि.अनुसूचीमध्ये कर्मचा-यांच्या भ.नि.नि.ची कपात नियमाप्रमाणे १२% दाखविण्यात यावी.
२. भ.नि.नि.कर्जाच्या हप्त्यांची वसूली भ.नि.नि. कर्ज मंजूरीच्या आदेशाप्रमाणेच करावी.
३. एक रकमी कर्जाची परतफेड अनुसूचीच्या उपविभाग ९९ मध्ये दर्शवितांना कर्जाची रक्कम,व्याज, व विश्वस्त मंडळाचा १% वाटा विभागून दाखविण्यात यावा.
४. सणासूदीसाठी देण्यात येणारे कर्ज (Festival Advance ) भ.नि.नि.च्या अनुसूचीत दाखविण्यात येवू नये.
५. अनुसूची सोबत उपविभागांचा एकत्रीत तक्ता ( Abstract ) सोबत जोडण्यात यावा.
६. भ.नि.नि.अनुसूची सोबत एस फॉर्म ची प्रत जोडण्यात यावी. व ती Schedule शी टॅली असावी.
७. भ.नि.नि अनुसूची लेखापरीक्षीत करुनच सादर करावी.
८. सभासद भ.नि.नि.क्रमांक व सभासदाचे नांव यामध्ये तफावत असू नये.
९. नवीन सभासद नंबर मिळाल्याशिवाय कर्मचा-याचे नांव अनुसूचीमध्ये समाविष्ट करु नये.
१०. Supp.Schedule करताना पूर्ण नांव लिहावे व कोणत्या महिन्याचे किंवा पेमेंटचा तपशील रिमार्क रकान्यामध्ये लिहण्यांत यावा.

वरील बाबींची पुर्तता करुन भ.नि.नि.अनुसूची या कार्यालयास प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यन्त सादर करण्यात याव्यात. व त्या एस आणि आर फॉर्मशी टॅली असाव्यात. वेळेवर अनुसूची सादर करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत विभागाची राहील याची नोंद घ्यावी.

सहाय्यक महा व्यवस्थापक/भनिनि.

सोबत : प्रेषण यादीप्रमाणे.
सर्व विभागीय कार्यालयापर्यन्त.